## चित्रपट - कुंकू

जरठविवाह ही सामाजिक समस्या हाताळण्यासाठी चित्रपटाच्या तंत्राचा अत्यंत कुशलतेने वापर करुन व्ही शांताराम यांनी 'कुंकू' ही अप्रतिम कलाकृती दिग्दर्शित केली आहे. या चित्रपटातील 'अहा भारत विराजे' आणि 'भारती सृष्टीचे सौंदर्य खेळे' या दोन गाण्यात वाद्यमेळ वापरलेला नाही. तांब्यावर काठीने आघात करुन दिलेला ठेका आणि शांता आपटे आणि वासंती यांचे सहजसुंदर आवाज यांनी ही गाणी श्रवणीय झाली आहेत. ही दोन गाणी चित्रपटातील असून त्या काळातील शालेय पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यात आली होती.

'मन सुद्ध तुझं, गोस्त हाये प्रिथ्वीमोलाची' हे मास्टर परशुराम यांच्या आवाजातील गाणे आजही लोकप्रिय आहे. व्ही. शांताराम यांनी या चित्रपटात Longfellow लॉंगफेलो या कवीची 'Psalm of Life' साम ऑफ लाईफ ही इंग्लिश कविता शांता आपटे यांच्याकडून एका एंग्लो इंडियन संगीततज्ञाच्या मार्गदर्शनाखाली गाऊन घेतली आहे. त्याच पद्धतीचे गीत आठवले यांनीही लिहिले. "विशाल हे विश्व भल्या बुऱ्यांचे, नसे फुलांचे नच कंटकांचे".

## चित्रपट - कुंकू

### एक होता राजा

एक होता राजा, एक होती राणी
अचल तयांची अनुपम प्रीती

दिव्य तयांची सुंदर नगरी
दु:ख न तेथे वास करी

विटुनि आपुल्या सदना उतरे
स्वर्गसौख्य जणु भूमिवरी.

बोले राणी – 'मन्मन मोती'
राजा बोले – 'मी मनचोर'

राणी बोले – 'चंद्रिकाच मी'
राजा बोले – 'मीहि चकोर'.

प्रणयोद्यानी करिती क्रीडा
दंग नर्तनी हर्षभरे
नाचती लतिका, फुले, झरे.

## चित्रपट - कुंकू

### विशाल हे विश्व भल्या बुऱ्यांचे

विशाल हे विश्व भल्या बुऱ्यांचे
नसे फुलांचे, नच कंटकांचे

शिरी धरी हे कधी दुर्जनांना
उरी विदारी दुबळ्या जनांना.

जरी टळेना विपदा कुणाला
हवी जगाला मृदु सौख्यमाला.

स्वार्थी अशा या सुखलालसेने
दुणावते दु:ख कुणी न नेणे.

धरी न चित्ती भय तू जगाचे
हसूनि साही शर आपदेचे.

पहा खरे सौख्य तयात राही
सुधाच होई मग आपदाही.

तुझ्यासवे दु:खहि ते हसेल
तुझे मनोवैभव वाढवील.

## चित्रपट - कुंकू

**भारती सृष्टीचे सौंदर्य खेळे**
**दावित सतत रूप आगळे**

भारती सृष्टीचे सौंदर्य खेळे
दावित सतत रूप आगळे

वसंत वनात जनात हसे
सृष्टीदेवी जणु नाचे उल्हासे

गातात संगीत पृथ्वीचे भाट
चैत्र वैशाखाचा ऐसा हा थाट

ज्येष्ठ आषाढात मेघांची दाटी
कडाडे चपला होतसे वृष्टी

घालाया सृष्टीला मंगल स्नान
पूर अमृताचा सांडे वरून

गगनी नर्तन कृष्ण मेघांचे
भूतली मयूर उत्तान नाचे

श्रावणी पाऊस हास्याचा पडे
श्रीकृष्ण जन्माची दंगल उडे

बांधिती वृक्षांना रम्य हिंदोळे
कामिनी धरणी वैभवी लोळे.

## चित्रपट - कुंकू

### मन सुद्ध तुझं गोस्त हाये पृथ्वी मोलाची

मन सुद्ध तुझं गोस्त हाये पृथ्वी मोलाची
तू चाल पुढं तुला र गड्या भीती कशाची
पर्वा बी कुनाची.

झेंडा भल्या कामाचा जो घेउनी निघाला
काट कुट वाट मंदी बोचती त्येला
रगत निगल तरी बी हसल, शाबास त्येची
तू चाल पुढं तुला र गड्या भीती कशाची
पर्वा बी कुनाची.

जो वळखितसे औक्ष म्हंजी मोठी लढाई
अन हत्याराचं फुलावानी घाव बी खाई
गळयामंदी पडल त्येच्या माळ विजयाची
तू चाल पुढं तुला र गड्या भीती कशाची
पर्वा बी कुनाची.

## चित्रपट - कुंकू

### अहा भारत विराजे, जगा दिपवीत तेजे

अहा भारत विराजे, जगा दिपवीत तेजे

भादव्यात येती गौरी गणपती उत्सवा येई बहार
मेळे आरास करोनी गाती हसुनी नाचुनी

ध्वनी त्यातहि गाजे, अहा भारत विराजे.
नवरात्र पूजेची आश्विनशोभा करिती नारी शृंगार

लेऊनि वसने मजेदार गळा विविध अलंकार
ध्वनी त्यातुनि निनादे, अहा भारत विराजे.

आली दिवाळी भुवन उजळी आनंद घे अवतार
दीपक नभीचे भूवरी येती दाविती शोभा अपार

माला तोरणे फुलांची वसने भूषणे जनांची
मनी स्वर्गही लाजे, अहा भारत विराजे.

## चित्रपट - कुंकू

### प्रभुराया रे हो संकट हे अनिवार

प्रभुराया रे हो संकट हे अनिवार

खवळूनि सागर गरजत नाचे चोहिकडे अंधार
फुटले तारू कुणा पुकारू जाईल कैसे पार?

स्थिरली नौका क्षणभर वाटे दाविशी साक्षात्कार
परि तो ठरला भास, उफाळति लाटा अपरंपार.

पसरुनी निज कर लहरीरूपे न्या हो सागरपार
धावा धावा सदया देवा, कोण दुजा आधार?